

पणजी : गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करताना उपसभापती विष्णु सूर्या वाघ व इतर मान्यवर.

# पुस्तकासारखा दुसरा मित्र नाही

## उपसभापती विष्णू सूर्या वाघ : गोवा लायब्ररी असोसिएशनचे उद्घाटन

**पणजी : प्रतिनिधी**

पुस्तकासारखा दुसरा मित्र, गुरू नाही. एखाद्यावेळेस मित्र मैत्री तोडू शकतो, गुरु विद्या लपवू शकतो, पण पुस्तक नाही. प्राचीन-आधुनिक अशा विचारांचे संचित जाणून घेण्यासाठी पुस्तक हे महत्त्वाचे माध्यम आहे, असे प्रतिपादन उपसभापती विष्णू सूर्या वाघ यांनी केले.

गोवा लायब्ररी असोसिएशन या नवीन संघटनेच्या उद्घाटनसमयी प्रमुख पाहूणे या नात्याने वाघ बोलत होते.

आपण किती वाचतो, यापेक्षा काय वाचतो आणि कसं वाचतो यावर आपली आकलनशक्ती, स्मरणशक्ती वाढते. आजच्या तांत्रिक युगात वाचनालयांनीसुध्दा बऱ्यापैकी आपली सांगड आधुनिक तंत्रज्ञानाशी घातलेली आहे. फक्त ज्ञानपिपासू विद्यार्थ्यांची गरज आहे, असेही वाघ म्हणाले.

उपसभापती वाघ यांच्या हस्ते गोवा लायब्ररी असोसिएशनच्या मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

संस्थापक अध्यक्ष निर्मला परब यांनी प्रास्ताविक केले. खजिनदार बाळा मांद्रेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सचिव मानसी ~~केळीप~~ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पुढारी | गोवा, शनिवार १६ जुलै २०१६



गोवा लायब्ररी आसोसिएशनच्या मार्गदर्शकीचे प्रकाशन करताना उपसभापती विष्णू वाघ. सोबत मान्यवर.

## गोवा लायब्ररी असोसिएशनचे उद्घाटन

**पणजी (पत्रक)**

पुस्तकासारखा दुसरा चांगला मित्र नाही, गुरु नाही, वेळेस मित्र मैत्री तोडू शकतो, गुरु विद्या लपवू शकतो पण पुस्तक नाही. प्राचीन आधुनिक अशा विचारांचे संचित जाणून घेण्यासाठी पुस्तक हे महत्त्वाचे माध्यमं आहे, असे प्रतिपादन उपसभापती विष्णू सूर्या वाघ यांनी केले. 'गोवा लायब्ररी असोसिएशन' या नवीन संघटनेच्या उद्घाटन समयी प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते. आपण किती वाचतो यापेक्षा काय वाचतो आणि कस वाचतो यावर आपली आकलन शक्ती वाढत जाते, स्मरणशक्ती वाढते. स्वतः बद्दल त्यांच्या वाचन लेखन या पार्श्वभूमीचा आढावा घेत वाघ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनासाठी आवाहन केले. आजच्या तांत्रिक युगात वाचनालयांनी सुद्धा बऱ्यापैकी आपली सागंड आधुनिक तंत्रज्ञानाशी घातलेली आहे. फक्त ज्ञानपिपासू विद्यार्थ्यांची गरज आहे असही वाघ म्हणाले, यावेळी उपसभापतींच्या हस्ते गोवा लायब्ररी असोसियेएशनच्या मार्गदर्शकीचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी साळगावकर कॉलेजचे प्रिन्सीपल प्रसादसर यांनी पण आपले मनोगत व्यक्त केले. तत्पूर्वी संस्थापक अध्यक्ष निर्मला परब यांनी प्रास्ताविक